## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
कोल्हापूर जिल्हयातील सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

जिल्हा परिषद / पंचायत समिती, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका २०१७ साठी मतदार नोंदणीकरीता जनजागृती अभियान राबविण्याबाबतचे मा.जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र.कार्या.१०/निवडणूक/ मत.नोंदणी./आरआर/८७२/१६, दि.२३/०९/२०१६ चे पत्र तसेच मा.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक-रानिआ२माजअ-२०१६/प्र.क्र.४/ का.१०, दि.३ सप्टेंबर,२०१६ ची पत्रे आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केली आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 142
दि. 10 OCT 2016

(1)

(४)

मतदार यादीतील आपल्या नावांची खात्री करण्यासाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भेट दयावी.

निवडणूक तात्काळ

कार्या.10/निवडणूक/मत.नोंदणी./आरआर/872/16
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक २८/09/2016

प्रति,

मा. कुलगुरू,
शिवाजी विदयापीठ,
विदयानगर, कोल्हापूर.

NDP
07/10

विषय- जिल्हा परिषद /पंचायत समिती,महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका २०१७ साठी मतदार नोंदणीकरीता जनजागृती अभियान राबविण्याबाबत.

संदर्भ - मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील क्रं रानिआ/माजअ-२०१६/प्रक्र-४/का.१० हुतात्मा राजगूरू मार्ग मुंबई दिनांक ३ सप्टेंबर २०१६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, राज्यातील 26 जिल्हा परिषदा 197 पंचायत समित्या आणि 18 महानगरपालिकांच्या निवडणूका 2017 मध्ये होणार आहेत. या निवडणूकांसाठी दिनांक 1 जानेवारी 2017 या पात्रता दिनांकावर आधारीत विधानसभेची मतदार यादी ग्राहय धरण्यात येणार आहेत.

मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक 16 सप्टेंबर ते 14 ऑक्टोंबर 2016 या कालावधीत विधानसभा मतदार यादयांचा पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. 1 जानेवारी 2017 रोजी वयाची 18 वर्षे पूर्ण करणा-या पात्र नागरीकांनी या कालावधीत मतदार यादीत नांव नोंदविले तरच त्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये मतदान करता येईल.

मतदार नोंदणी हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. त्यामुळे आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची नांवे मतदार यादीत असलेचे खात्री करणेसाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट देणेबाबतच्या सूचना देणेत याव्यात. तसेच ज्या अधिकारी व कर्मचा-यारी यांची नावे मतदार यादीमध्ये नसले त्यांना मतदार यादीत नांव सामाविष्ट करणेचा नमुना नंबर 6 भरून देणेबाबत आपले स्तरावरुन सूचना देणेत याव्यात. सोबत नमुना क्रं 6 जोडलेला आहे.

आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची मतदार यादीत नांव असलेबाबतची माहिती खालील नमुन्यात माहीती देणेत यावी.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | कार्यालयातील एकूण अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | अगोदरच मतदारयादीत नाव असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | आता नाव नोंदणी केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | शिल्लक संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

16

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2.
Inward No. 4663
Date 07/10/16

मतदार यादीतील आपल्या नावांची खात्री करण्यासाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भेट दयावी.

जे कर्मचारी मतदारयादीत नाव नोंद करणार नाहीत त्यांची वेतन देयक थांबविणेत येवून तसे जिल्हा कोषागार, कोल्हापूर यांना कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.

आगामी जिल्हा परिषद निवडणूकीसाठी मतदार जनजागृती एकत्रीत करणेची आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्हातील सर्व महाविदयालयांना आपलेमार्फत कळविणेत यावे. तसेच मतदार जनजागृतीसाठी सर्व विदयार्थ्यांची यांची रॅली काढणे, पथनाटयाचे आयोजन करणे, मतदार जनजागृती करणेसाठी रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा इ. यांचे आयोजन करणेत यावे. तसेच या स्पर्धेतून प्रथम 3 क्रमांक इकडील कार्यालयाला कळविणेत यावे.

तसेच ज्या आपल्या अंतर्गत येणा-या कोल्हापूर जिल्हातील सर्व महाविदयालयातील विदयार्थ्यांनी मतदार यादीमध्ये नांव नोंदवणेसाठी प्रोत्साहित करणेत यावे. आपल्या संकेतस्थळावर मतदार नोंदणी करणेसाठीचा संदेश प्रसिध्द करणेत यावा.

मा. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या परिशिष्ट - 2 मध्ये सदरचा अहवाल व अधिकारी व कर्मचारी यांची मतदार यादीत नांव असलेबाबतची माहिती दिनांक-10 ऑक्टोबर 2016 अगोदर dydeokolhapur@gmail.com या ई मेल आयडीवर पाठविणेत यावा.

जिल्हाधिकारी व
जिल्हा निवडणूक अधिकारी
कोल्हापूर करिता

प्रत,

1) मा. जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचे स्विय सहाय्यक यांना
2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर.
3) उपजिल्हाधिकारी महसूल (जि.प./पं.स.)

महानगरपालिका/जि. प./ पं. स. सार्वत्रिक निवडणुका-२०१७ मतदार नोंदणीकरिता जनजागृती करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/माजअ-२०१६/प्र.क्र.४/का.१०
१ला माळा,नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२. दूरध्वनी ०२२ २२०४६९०९
मेल- mahasecpro@gmail.com
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

प्रति,
मा. विभागीय आयुक्त, सर्व
मा. जिल्हाधिकारी, (२६)
मा. महानगरपालिका आयुक्त, (बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, मीरा- भाईंदर, भिवंडी, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, नाशिक, मालेगाव, नांदेड, लातूर, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर आणि चंद्रपूर.)

विषय: जिल्हा परिषद/पंचायत समिती, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका- २०१७ साठी मतदार नोंदणीकरीता जनजागृती अभियान राबविण्याबाबत.

संदर्भ: समक्रमांकाचे दि. २० ऑगस्ट २०१६ रोजीचे पत्र.

महोदय,

आपल्याला माहीतच आहे की, राज्यातील २६ जिल्हा परिषदा, १९७ पंचायत समित्या आणि १८ महानगरपालिकांच्या निवडणुका सन २०१७ मध्ये होणार आहेत. या निवडणुकांसाठी दि. १ जानेवारी २०१७ या पात्रता दिनांकावर आधारित विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे.

३. भारत निवडणूक आयोगाने दि. १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत विधानसभा मतदार याद्यांचा पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. १ जानेवारी २०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकाने या कालावधीत मतदार यादीत नाव नोंदविले तरच त्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करता येईल.

४. वरील पार्श्वभूमी लक्षात घेता व्यापक प्रमाणावर मतदार जागृती अभियान राबवावयाचे आहे. जेणेकरुन नवीन नावे नोंदविण्याबरोबरच नावामध्ये दुरुस्ती, दुबार किंवा मृताचे नाव वगळणे शक्य होईल. त्या आनुषंगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

५. मतदार जागृती मोहिमेसाठी आयोगाने गठित केलेल्या समितीच्या वतीने ठाणे महानगरपालिकेने तयार केलेले मतदार जागृतीसाठीचे साहित्य आपणास पाठविण्यात येत आहे. यापूर्वी पाठविलेल्या साहित्यात किरकोळ बदल व दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. त्या आपल्या स्तरावर केल्या असल्यास तरीही हरकत नाही. जाहिरातीचे अंतिम नमुने पुढीलप्रमाणे पाठविण्यात येत आहेत:

अ) वृत्तपत्रे, बॅनर, होर्डिंग, सोशल मीडिया इत्यादिंसाठीचे आर्ट वर्क (PDF, CDR & JPEG)
ब) मोबाईल एसएमएसचा नमुना
क) व्हिडीओ क्लिप्स (थिएटर, टीव्ही, व सोशल मीडियासाठी)

६. जाहिरातींचे तीन वेगवेगळे नमुने आहेत. तिन्ही नमुने वेगवेगळ्या माध्यमांसाठी वापरता येऊ शकतील. या जाहिरात नमुन्यांवर आपल्या महानगरपालिकेचे किंवा जिल्हा परिषदेचे नाव टाकावे; तसेच आपला लोगो भारत निवडणूक आयोग किंवा राज्य निवडणूक आयोगापेक्षा मोठा घ्यावा. व्हिडोओमध्येदेखील आपल्याला स्थानिक पातळीवर किरकोळ एडिटिंग करून आपल्या महानगरपालिका व जिल्हा परिषदेचे नाव, लोगो आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्याचा पत्ता टेक्स्टच्या स्वरुपात टाकता येईल. जाहिराती वितरित करण्यापूर्वी त्यात उल्लेख केलेल्या ठिकाणी मतदार नोंदणी अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था असल्याची खात्री करावी.

७. मतदार जागृतीसाठी आपण या साहित्याचा वापर करु शकता किंवा आपणाकडे या साहित्यापेक्षा किंवा जाहिरातींचे चांगले आर्टवर्क किंवा संकल्पना असल्यास त्यांचाही आवर्जून वापर करावा.

मतदार जागृती अभियान पारंपारिक व नावीन्यपूर्ण अशा दोन पध्दतीने राबवायचे आहे. उदा.

अ) पारंपरीक: वर्तमानपत्रे, सिनेमागृहे इ. माध्यमांत जाहिरात देणे, बस स्थानक, पेट्रोल पंप, रिसॉर्ट, इ. ठिकाणी होर्डिंग, बॅनर्स लावणे, हॅंडबील्स वाटणे. टीव्हीवर स्क्रोल देणे, रेडिओवरुन जिंगल्सचे प्रसारण करणे.

ब) नावीन्यपूर्ण: सोशल मीडियाचा (एसएमएस, वॉटस्ॲप, फेसबुक, ट्विटर इ.) प्रभावी वापर करणे. पथनाट्चे सादर करणे, महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीविषयी कार्यक्रम आयोजित करणे, गृहनिर्माण सोसायट्या, महाविद्यालये, प्रतिष्ठित नागरिकांना सहभागी करुन घेणे, उद्योगांच्या मदतीने गृहनिर्माण सोसायट्या व महाविद्यालयांना सर्वाधिक मतदार नोंदणी केल्याबद्दल पुरस्कार देणे, कम्युनिटी रेडिओचा वापर करणे, गणेशोत्सवात स्पर्धेचे आयोजन करणे.

वरील मुद्यांसंदर्भातील तपशीलवार माहितीसाठी परिशिष्ट १ सोबत जोडले आहे.

८. मतदार जागृतीसाठी आपण केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल परिशिष्ट क्र. २ सह राज्य निवडणूक आयोगाकडे २५ ऑक्टोबर २०१६ पर्यंत विनाविलंब पाठवावा. त्यासोबत तांत्रिकदृष्ट्या उच्च दर्जाची निवडक छायाचित्रेही पाठवावीत.

९. महानगरपालिका व जिल्हा परिषद/ पंचायत समितीच्या निवडणुका लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांप्रमाणेच चुरशीच्या असतात. त्यामुळे मतदानाच्या वेळी मतदार यादीत नाव नसणे किंवा तपशीलात चूक असणे यासारख्या तक्रारी मोठ्याप्रमाणावर येण्याची शक्यता असते; तसेच न्यायालयीन प्रकरणेही होतात. त्यामुळे मतदार जागृती अभियानावर गांभीर्याने लक्ष केंद्रीत करुन मतदानाच्या वेळी अशा स्वरुपाच्या तक्रारी उद्भवणार नाही, याची आपण दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला,

(जगदीश मोरे)
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

*विशेष सूचना: जाहिरात नमुन्यांवरील मतदार नोंदणीची तारिख `१५ सप्टेंबर`ऐवजी `१६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६` अशी करावी; तसेच अधिक माहितीसाठी `मतदान`ऐवजी `मतदार नोंदणी अधिकारी` व `मतदार नोंदणी केंद्र` असे करावे.*

## परिशिष्ट- १

### मतदार जागृती अभियान: कृती आराखडा

- महानगरपालिका/ जिल्हा परिषदा/ पंचायत समित्यांच्या संकेतस्तळावरील मुखपृष्टावर (होमपेज) मतदारांना आवाहन करणारा संदेश प्रसिद्ध करणे
- महानगरपालिका/ जिल्हा परिषदा/ पंचायत समित्यांच्या कार्यक्षेत्रात मोक्याच्या ठिकाणी होर्डिंग/ बॅनर्स लावणे
- स्थानिक कलावंताच्या मदतीने मतदार जागृतीबाबत शहरात ठिकठिकाणी पथनाट्य सादर करणे
- मालमत्ता व पाणीपट्टीच्या देयकांवर मतदारांना आवाहन करणारे संदेश छापणे
- सिटी बसेस, एसटी बसेस, लोकल ट्रेन इ.च्या बस थांब्यांवर फलक लावणे
- महानगरपालिका/ जिल्हा परिषदा/ पंचायत समित्यांच्या प्रत्येक टेंडर व अन्य जाहिरातींवर संदेश प्रसिद्ध करणे
- पेट्रोल पंप व शिधा वाटप दुकानांच्या ठिकाणी ठळक स्वरूपाचे फलक लावणे
- स्थानिक व सहकारी बँकांच्या मदतीने एटीएमच्या ठिकाणी फलक लावणे
- टुर्स ऑपरेटर्स, हॉटेल, रिसॉर्ट आदींच्या सहकार्याने संबंधित ठिकाणी फलक लावणे
- स्थानिक आरटीओ कार्यालयाशी संपर्क साधून त्यांच्या सहकार्याने रिक्षा, टॅक्शी व अन्य खासगी वाहनांवर स्टीकर लावणे
- स्थानिक आरटीओ कार्यालयाच्या सहकार्याने वाहन चालविण्याचा शिकाऊ परवाना देतांना मतदार नोंदणी अर्ज भरुन घेण्याचे आवाहन करणे
- मालमत्ता कर व अन्य विभागांकडे उपलब्ध मोबाईल क्रमांकांचा वापर करून एसएमएस करणे
- राजकीय पक्षांच्या बैठका घेऊन त्यांना मतदार जागृती अभियानामध्ये सहभागी करून घेणे
- विशेषत: राजकीय पक्षांच्या युवक व विद्यार्थी आघाड्यांना यात सहभागी करून घेणे
- महानगरपालिका/ जिल्हा परिषदा/ पंचायत समित्यांच्या सभेत मतदार जागृतीसंदर्भात नगरसेवकांना अवगत करावे; तसेच त्यांना पत्राद्वारेही आपापल्या प्रभागात मतदार नोंदणी व मतदार यादीतील मृत/ स्थलांतरीतांची नावे वगळण्याबाबत आवाहन करण्यासंदर्भात विनंती करणे
- गाव/शहरातील मान्यवर, राजकीय नेते व लोकप्रतिनिधींना पत्र पाठवून जागृती करण्याचे आवाहन करणे
- नामांकित व्यक्तींच्या (उदा. खेळाडू, कलावंत, प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते इ.) माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करावी
- महानगरपालिका/जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून महाविद्यालयांत मतदार जागृती करणे
- महाविद्यालयांत प्रवेश देतांना विद्यार्थ्यांचे मतदार नोंदणी अर्ज भरून घेण्याचे आवाहन करणे
- जनजागृती अभियानात एनसीसी, एनएसएस, स्काऊट ॲण्ड गाईड इ. च्या विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे
- महाविद्यालयांतील विविध उत्सव व कार्यक्रमांमध्ये मतदार जागृती करणे
- मतदार जागृतीबाबत विद्यापीठ/महाविद्यालयांमध्ये विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करणे

नावीन्यपूर्ण उपाययोजना

- महाविद्यालयांच्या मदतीने विद्यार्थ्यांना गृहनिर्माण सोसायट्या दत्तक देणे व त्या सोसायट्यांना विद्यार्थ्यांनी भेटी देऊन मतदार नोंदणीसाठी आवाहन करणे
- उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना व सोसायट्यांना बक्षिसे देण्याबाबत विचार करणे
- कम्युनिटी रेडिओंचा प्रभावी व व्यापक प्रमाणात वापर करून अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहचणे

प्रसारमाध्यमांचे सहकार्य घेणे

- स्थानिक उपलब्ध प्रसारमाध्यमांतून (उदा. वृत्तपत्रे, वृत्त वाहिन्या, एफएम, कम्युनिटी रेडिओ, सिनेमा गृह, केबल टीव्ही. इ.) जाहिराती देणे
- मा. जिल्हाधिकारी/ मा. महानगरपालिका आयुक्त यांनी स्वत: पत्रकार परिषद आयोजित करून मतदार नोंदणी मोहिमेला अधिकाधिक प्रसिद्धी द्यावी
- मतदार नोंदणी मोहीम विधानसभा मतदार यादीसाठी असली तरी हीच मतदार यादी महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीदेखील वापरली जाणार आहे, हे पत्रकार परिषदेत आवर्जून निदर्शनास आणून द्यावे
- मतदार जागृतीसाठी स्थानिक केबल वाहिन्यांवर मुलाखती, चर्चासत्रे आयोजित करावीत.
- प्रसारमाध्यनांच्या प्रतिनिधींसाठी पत्रकारांच्या स्थानिक संघटनांच्या सहकार्याने कार्यशाळांचे आयोजन करणे
- एफएम वाहिन्यांवर निवेदकाच्या माध्यमातून जनहितार्थ उद्घोषणा करण्यासाठी सहकार्य मिळविणे
- मतदार जागृती अभियानाला व्यापक प्रसिद्धी देण्याबरोबरच प्रसारमाध्यमांना जनहितार्थ संदेश प्रसारीत करण्याची विनंती करणे
- सिनेमा चालक/मालकांची बैठक आयोजित करून लोकहितार्थ संदेश प्रसारित करण्यास सांगणे
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर करण्यासाठी मायक्रो फिल्मस् तयार करून त्या व्हायरल करणे
- सोशल मीडियावर मायक्रो फिल्मससोबतच आकर्षक व्हर्बल संदेश तयार करून व्हायरल करणे
- फेसबूक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर पेज/हँडल तयार करणे

## परिशिष्ट- २

| मतदार जागृती अभियानाचा अहवाल | | |
|---|---|---|
| अ.क्र. | जनजागृती अभियानाचा तपशील | शेरा |
| १. | पत्रकार परिषद | |
| २. | वर्तमानपत्रातील जाहिरात | |
| ३. | स्थानिक केबल टीव्हीवरील जाहिरात | |
| ४. | स्थानिक एफएम/ कम्युनिटी रेडिओवरील जाहिरात | |
| ५. | एफएम/ कम्युनिटी रेडिओवरील मुलाखती, कार्यक्रम | |
| ६. | सिनेमागृहातील जाहिरात | |
| ७. | एसटी बसेसवरील जाहिरात | |
| ८. | सोशल मीडियाचा कशा प्रकारे केला | |
| ९. | मोबाईल एसएमस (किती क्रमांकावर किती वेळा) | |
| १०. | होर्डिंग संख्या | |
| ११. | बॅनर्स संख्या | |
| १२. | हँडबील्स संख्या | |
| १३. | पथनाट्य (स्थानिक कलावंत्याच्या मदतीने) | |
| १४. | महाविद्यालयांमधील कार्यक्रम संख्या व तपशील | |
| १५. | इतर | |

जाहिरातींची संख्या नमूद करावी उदा. किती वृत्तपत्रांत किती वेळा प्रसिद्ध केल्या. आपण राबविलेल्या अभियानाबाबतची चांगल्या दर्जाची निवडक छायाचित्रे पाठवावित.

# Mobile SMS Draft for Municipal Council elections 2016

E-1
Characters (With Space) 124

Municipal Corporation, Z.P./ P.S. Elections 2017: register name as voter if already not done during 16 Sept to 14 Oct. 2016.

---

E-2
Characters (With Space) 151

Completing 18 years on 1.1.2017? Register your name in voter list during 16 Sept to 14 Oct. 2016. For Municipal Corporation, Z.P./ P.S. elections 2017.

---

E-3
Characters (With Space) 111

Last date to correct details in voter list for Municipal Corporation, Z.P./P.S. elections 2017 is 14 Oct. 2016.

---

M-1
Characters (With Space) 155

महानगरपालिका, जिल्हा परिषदा/ पंचायत समितीच्या २०१७ मधील निवडणुकांत मतदान करण्यासाठी विधानसभा मतदार यादीत १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ दरम्यान नाव नोंदवा.

---

M-2
Characters (With Space) 161

१ जानेवारी २०१७ रोजी १८ वर्षे पूर्ण होत असल्यास १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ दरम्यान मतदार यादीत नाव नोंदवा आणि महानगरपालिका, जिल्हा परिषदा/ पंचायत समितीच्या २०१६ मधील निवडणुकांत मतदान करा.

---

M-3
Characters (With Space) 144

महानगरपालिका, जिल्हा परिषदा/ पंचायत समितीच्या २०१७ मधील निवडणुकांत मतदान करण्यासाठी १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ पर्यंत विधानसभा मतदार यादीतील तपशिलांत दुरुस्ती करा.